**उप अभियंता - (विद्युत) (गट-अ)**
**संवर्गात ११ महिन्याकरीता (Adhoc)**
**पदोन्नत्या/ नेमणूका/ बदल्या**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०२२/००५५18 /प्र.७**
**दिनांक :-** 26 JUL 2022

**संदर्भ -** कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांचे पत्र क्र.पदस्था-२०२१/
प्र.क्र.८०/गृनिभू, दि.१३.०७.२०२२

**आ दे श**

कार्यासन अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांच्या संदर्भाधिन पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार प्रशासकीय हित व कामाची निकड लक्षात घेऊन, **(पदविकाधारक शाखा अभियंता-विद्युत) (गट-ब)** या संवर्गातील खालील नमूद अभियंत्यांना पदवीधर उप अभियंत्याची नेमणूक होईपर्यत किंवा ११ महिने यापैकी जो कमी कालावधी असेल, त्या कालावधीसाठी **उप अभियंता विद्युत (गट-अ)** या संवर्गात एस-२० रु.५६१००-१७७५०० या वेतनस्तरामध्ये तात्पुरत्या स्वरूपात Adhoc पध्दतीने कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यांत येत आह

| अ. क्र. | अभियंत्याचे नाव | सध्याचे कार्यालय | पदोन्नती नंतरचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती.रेणूका व्ही.भोपळे, | मुंबई मंडळ | मुंबई मंडळ | रिक्त पदी |
| २ | श्रीमती.प्रियंका चं.ठाकूर | मुं.इ.दु.व.पु मंडळ | मुं.इ.दु.व.पु मंडळ | रिक्त पदी |

२/- सदर पदोन्नती ११ महीने किंवा पदवीधर उप अभियंते उपलब्ध होतील, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत कार्यरत राहील.

३/- सदर पदोन्नती पदवीधर उप अभियंता कोटयातील रिक्त असलेल्या पदावर पदोन्नतीने अभियंत्यांची नेमणूक झाल्यानंतर वरीलप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात (Adhoc) पदोन्नती प्राप्त केल्यापैकी अनुक्रमे पदोन्नत पदविकाधारक उप अभियंता,या संवर्गातून त्या संवर्गातील सेवेतील कनिष्ठ असणा-या तात्पुरत्या पदोन्नत अभियंत्यांची पदोन्नती संपुष्टात आणण्यात येईल.

४/- सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात (Adhoc ) पध्दतीने ११ महिने किंवा पदवीधर उप अभियंते उपलब्ध होईल यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता देत असल्याने त्यांचा या संवर्गातील कायम पदावर कोणताही हक्क/धारणाधिकार राहणार नाही, या अटीवर करण्यात येत आहे.

५/- सदर तात्पुरत्या (Adhoc) पध्दतीने दिलेल्या अभियंत्याचा सदर पदोन्नतीचा सेवा कालावधी सेवा ज्येष्ठतेकरीता व सेवाविषयक इतर कोणत्याही बाबीकरीता ग्राहय धरला जाणार नाही, या अटीवर करण्यात येत आहे.

६/- सदर तात्पुरत्या (Adhoc) पध्दतीने दिलेल्या पदोन्नतीकरीता बिंदू नामावली लागू राहणार नाही.

७/- सदर पदोन्नतीने पदस्थापना दिलेल्या अभियंता पदावर रुजू न झाल्यास त्या गटातील ज्येष्ठतेने दुस-या क्रमांकावरील अभियंत्यांचा पदोन्नतीचा विचार करण्यात येईल.

८/- सदर तात्पुरत्या (Adhoc) पध्दतीने पदोन्नत होणाऱ्या अभियंत्यास पदोन्नतीपूर्वी वरील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र सादर करावे लागेल.

९/- संबंधित पदोन्नत पदधारकास पदोन्नतीनंतर अनुज्ञेय वेतनाबरोबर महागाई भत्ता व अन्य भत्ते नियमानुसार अनुज्ञेय राहतील.

१०/- शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१०८२/सीआर-११०० [एक ]/ सेवा-३, दिनांक ६/११/१९८४ नुसार संबंधित पदोन्नत पदधारकाने आपल्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावयाचा आहे. अन्यथा त्यांची वेतन निश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन ] नियम १९८१ च्या नियम ११ ची दिनांक ०३.०७.१९९३ अन्वयेची सुधारणा अर्थात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) (दुसरी सुधारणा) नियम १९९३ नियम ११ (१) मधील तरतुदीनुसार करण्यांत येईल.

११/- संबंधित पदोन्नत पदधारकास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनोचा लाभ देण्यात आलेला असल्यास, त्यांची वेतननिश्चिती पुन्हा करण्यात येऊ नये. याबाबत त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदी तपासून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

१२/- हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आंत पदोन्नत पदधारक यांनी नवीन नेमणूकीच्या ठिकाणी रुजू व्हावयाचे आहे. पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. पदोन्नत पदधारकास त्यांच्या सध्याच्या पदाचा व अतिरिक्त कार्यभार पहात असलेल्या पदाचा कार्यभाराबाबत सक्षम अधिका-यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

१३/- मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केलेली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानूसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनूसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनूसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

**१४/- उपरोक्त अधिकाऱ्यांनी दि.३१/३/२०२२ रोजीचे विहित विवरणपत्रात मत्ता व दायित्वे भरुन दिल्याची खात्री करुन घेतल्यांखेरीज संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश हस्तांतरीत**

**करण्यात येऊ नयेत. तसेच आदेश हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर अधिकाऱ्यांनी मत्ता व दायित्वे सादर केल्याचा तसेच वर नमूद अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमी पत्र सादर केल्याबाबतचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा.**

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.**
**यांचे मान्यतेने.**

(राजकुमार सागर)
सचिव / प्राधिकरण

**प्रति,**
**(-----------------------------------)**
**( संबंधित विभाग प्रमुखां मार्फत)**

**<u>प्रत सस्नेह अग्रेषित</u> :**
१) मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी / प्रा.
२) मा.मुख्य अधिकारी /मुंबई मंडळ /मुं.इ.दु.व.पु मंडळ
३) मुख्य अभियंता-१, २, ३/प्रा.
४) सहमुख्य अधिकारी /मुंबई मंडळ /मुं.इ.दु.व.पु मंडळ
५) मुख्य लेखाधिकारी /मुंबई मंडळ /मुं.इ.दु.व.पु मंडळ
६) माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्रा (संकेतस्थाळावर प्रसिध्द करण्याकरीता)
७) चौकशी अधिकारी/प्रा.
८) सक्षम प्राधिकारी/प्रा.
९) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१०) निवासी लेखा परीक्षाअधिकारी/प्रा.
११) पी.डी.सी.पुणे

**प्रत:**
१. प्रशासकीय अधिकारी, /मुंबई मंडळ /मुं.इ.दु.व.पु मंडळ
**<u>प्रत माहितीसाठी:-</u>**
मा.प्रधान सचिव / गृहनिर्माण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
मा.उपाध्यक्ष/प्रा.यांचेस्वीय सहाय्यक
अध्यक्ष,महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रधान कार्यवाह,मागासवर्गीय कर्मचारी संघटना
अध्यक्ष,ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा,मुंबई.

**प्रत:**प्रशासन-६,९,१०,११,१२,१३,/प्रा.

ICT/cellA